- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

**सोने-चांदी**

- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, ३० ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २६० | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# क्लार्कपदाची टायपिंग चाचणीही रद्द

**वृत्तसंस्था, मुंबई**

मुंबई उच्च न्यायालयाकडून १६ ऑगस्ट रोजी लिपिक पदासाठी टंकलेखन परीक्षा ऑनलाईन पद्धतीने राज्यभरात घेण्यात आली होती. मात्र, या परीक्षेमध्ये मोठा गोंधळ झाला. अनेक ठिकाणी तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नव्हती. तांत्रिक अडचणीमुळे संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या समस्या मांडल्यानंतर सीजेपीचे अभिजीत दीपके यांनी परीक्षा देणाऱ्या उमेदवारांसोबत छत्रपती संभाजीनगरला ठिय्या आंदोलन केले होते. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी देखील पाठपुरावा केला होता.

दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने १६ ऑगस्टची ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आलेली क्लार्क टंकलेखन चाचणी रद्द केली. परीक्षेची नवी तारीख नंतर जाहीर केली जाईल, असे कळविण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाच्या क्लार्क म्हणजेच लेखनिक पदासाठी उमेदवारांना ऑनलाईन टंकलेखन चाचणी यशस्वी होणे आवश्यक होते. मात्र, परीक्षा केंद्रावरील विविध अडचणींमुळे आणि इतर अडचणींमुळे म्हणजेच सर्व्हर डाऊन होणे, कीबोर्ड व्यवस्थित न चालणे अशा समस्या विद्यार्थ्यांना आल्या होत्या. यानंतर विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीनगर, कल्याण, वाशिम, हिंगोली यासह विविध ठिकाणी अडचणी आल्याचे सांगितले होते.

अखेर मुंबई हायकोर्टाकडून १६ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाइन टायपिंग टेस्ट परीक्षेला रद्द करण्याचा निर्णय घेतला. या परीक्षेची तारीख लवकरच संकेतस्थळावर कळवली जाईल, असे सांगण्यात आले. १६ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेली न्यायालयीन क्लार्क पदाची टायपिंग टेस्ट रद्द करण्याचा निर्णय न्यायालय प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयाचे स्वागत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केले.



### परीक्षेत मोठा गोंधळ

उच्च न्यायालयाच्या लिपिक भरतीसाठी घेण्यात आलेल्या टायपिंगच्या परीक्षेत मोठ्या प्रमाणात गोंधळ झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर उच्च न्यायालयाचे महानिबंधक मुनगंटे आणि महाधिवक्ता मिलिंद साठे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे संबंधित परीक्षेची टायपिंग टेस्ट रद्द करण्याची विनंती केली होती. त्यानुसार १६ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेली टायपिंग टेस्ट रद्द करण्यात आली. त्यामुळे मा. न्यायालयीन प्रशासनाचे आभार, असे रोहित पवार म्हणाले.

### हायकोर्टाचा दणका, परीक्षांमधील गोंधळ संपेना, आता फेरपरीक्षा घ्यावी लागणार

# पंतप्रधान मोदी ४ दिवसीय परदेश दौऱ्यावर

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चार दिवसीय परदेश दौऱ्याला आजपासून (२९ ऑगस्ट) सुरुवात झाली आहे. नरेंद्र मोदी २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत उझबेकिस्तान आणि किर्गिस्तानला या दोन देशांना भेट देणार आहेत. तसंच शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) २६ व्या शिखर परिषदेला नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी किर्गिझ प्रजासत्ताकाची राजधानी बिश्केक इथं एससीओ शिखर परिषद आयोजित करण्यात आली आहे.

दरम्यान, आपल्या परदेश दौऱ्यावर निघण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, सुरक्षा, संपर्क आणि संधी यांवर आधारित असलेल्या एससीओ शिखर परिषदेसाठीच्या भारताच्या दृष्टिकोनाला पुढं नेण्यास आणि दहशतवादाच्या धोक्यापासून मुक्त प्रदेश उभारण्यासाठी सहकारी सदस्यांसोबत मिळून काम करण्यास ते उत्सुक आहेत. उझबेकिस्तान आणि किर्गिझ प्रजासत्ताक या दोन देशांच्या दौऱ्यापूर्वी नरेंद्र मोदी यांनी असाही विश्वास व्यक्त केला की, या दौऱ्यामुळं मध्य आशियातील भारताची सामरिक भागीदारी अधिक मजबूत होईल. तसंच या प्रदेशासोबतचे सांस्कृतिक संबंध अधिक दृढ होतील. नरेंद्र मोदी म्हणाले की, या दौऱ्यामुळे शांतता, स्थैर्य आणि समृद्धीच्या आपल्या सामायिक ध्येयाला चालना मिळेल. हीच ती मूल्ये आहेत, जी जगासोबतच्या भारताच्या संबंधांच्या केंद्रस्थानी आहेत. याचबरोबर, भारत २०१७ पासून एससीओचा एक सक्रिय आणि रचनात्मक सदस्य राहिला आहे. मी या प्रदेशासाठी भारताच्या दूरदृष्टीला पुढं नेण्यास उत्सुक आहे. जी सुरक्षा, संपर्क आणि संधींवर आधारित आहे. तसंच, मला इतर सदस्यांसोबत मिळून दहशतवाद, फुटीरतावाद आणि अतिरेकीपणाच्या दुष्कृत्यांपासून मुक्त प्रदेश घडवण्यासाठी काम करायचे आहे, जे आपल्या शेजारच्या प्रदेशात आणि त्यापलीकडेही शांतता आणि स्थिरतेला सतत धोका निर्माण करत आहेत.

**थोडक्यात**

## मालेगाव ते वाशिम महामार्गावर अपघात, एकाचा मृत्यू,तर एक गंभीर

**वृत्तसंस्था, वाशिम**

मालेगाव ते वाशिम महामार्गावर कार आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात एक जण ठार झाला आहे तर एक जण गंभीर जखमी झालाय. अकोला हैद्राबाद महामार्गावरील वाशिमच्या धारकाटा फाट्यावर भरधाव कार समोर दुचाकी आडवी आल्याने भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात दुचाकी वरील युवती जागीच ठार झाली असून युवक गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात इतका भीषण होता की,दुचाकी कार समोर आडवी आल्याने कारने दुचाकीला अक्षरशा फुटबॉलसारखे उडवत पन्नास फूट दूर फेकल्या गेलेत. तर अपघातात दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. तर या मार्गावर दुचाकीचे पार्ट रस्त्यावर पडले होते. त्यामुळे दुचाकीवरील मुलीचा जागीच मृत्यू झाला. तर युवक हा गंभीर जखमी झाला असून, पुढील उपचारासाठी त्याला अकोला येथे रेफर करण्यात आले आहे.

## वाघाच्या हल्ल्यात तरुणाचा मृत्यू

**चंद्रपूर:** मोहर्ली वनपरिक्षेत्रातील मोहर्ली बिटअंतर्गत कक्ष क्रमांक १५४ मध्ये गुरे चारण्यासाठी गेलेल्या तरुणावर वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना शनिवारी (२९ ऑगस्ट) दुपारी घडली. या घटनेमुळे जुनोना परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुढील तपास वनविभाग व पोलिस विभाग करीत आहे.

# सीएनजी पुन्हा महागला, सर्वसामान्यांना महागाईची ओवाळणी



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

आखातात सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम देशातील इंधनांच्या दरांवरही होत आहे. कधी पेट्रोल-डिझेल, तर कधी एलपीजीच्या दरांमुळे सर्वसामान्यांचा खिसा कापला जात आहे. आता इंद्रप्रस्थ गॅस लिमिटेडने (आयजीएल) सीएनजीच्या दरामध्ये पुन्हा एकदा वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

आयजीएलने सीएनजीच्या दरामध्ये प्रति किलोमागे ३.८९ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला असून हे नवीन दर शनिवार सकाळपासून लागू होणार आहेत. यामुळे राजधानी दिल्लीमध्ये सीएनजीचे दर ८६.९८ प्रति किलोग्रॅम झाले आहेत. या दरवाढीमुळे सीएनजी वाहनधारकांच्या खिशावर अतिरिक्त ताण येणार आहे.

आयजीएलने एका निवेदनात स्पष्ट केले आहे की, आखातातील संघर्ष पुन्हा वाढल्यामुळे हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतील मालवाहतुकीवर सातत्याने परिणाम होत आहे. याचा परिणाम म्हणून संकटपूर्व काळाच्या तुलनेत जागतिक स्तरावर एलएनजीच्या किमती जवळपास दुप्पट झाल्या आहेत. याशिवाय, हिवाळा तोंडावर आल्यामुळे युरोपला त्यांच्या नैसर्गिक वायूच्या साठ्यात वाढवण्याची घाई झाली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून सीएनजीच्या दरांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. विशेष म्हणजे यंदाच्या वर्षात पाच वेळा सीएनजीचे दर वाढले आहेत. आखातात सुरू असलेल्या युद्धामुळे तेल आणि गॅस वाहतूक विस्कळीत झाली आहे, त्यामुळे पेट्रोल-डिझेल, सीएनजी, पीएनजीच्या किमती सातत्याने वाढत आहेत.

# नेपाळमधून १४३ भाविक मायभूमी महाराष्ट्रात परतले, रेल्वेने १०६ जण नागपूरला

**वृत्तसंस्था, काठमांडू**

नेपाळच्या महाप्रलयामध्ये ६०० हून अधिक नागरिक मृत्युमुखी पडले आहेत, तर हजारो नागरिक बेपत्ता असल्याची माहिती आहे. तसेच अनेकजण जखमी झाले आहेत. सध्या दुर्घटनेतील जखमींवर नेपाळच्या काठमांडू शहरातील शिक्षण हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. त्यामध्ये, काही भारतीय नागरिकांचाही समावेश आहे. तर, नेपाळच्या महाप्रलयातून आपला जीव मुठीत धरुन अकडलेले महाराष्ट्रातील भाविकांना मदत पोहोचली असून ते मायभूमीत परत येत आहेत. नागपूरचे १०६, महाराष्ट्रातील इतर ३७ भाविक आज आपल्या घरी येण्यासाठी रवाना झाले आहेत. त्यामध्ये, १०६ भाविक नागपूरला उतरतील, तर ३७ नागरिक मुंबईत पोहोचले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने नेपाळमध्ये अडकलेल्या 106 भाविकांचा महाराष्ट्राकडे सुरक्षित परतीचा प्रवास सुरू झाल्याने कुटुंबीयांना दिलासा मिळाला आहे. नेपाळपासून पटणापर्यंत भाविकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक समन्वय आणि मदतही करण्यात आली. नेपाळहून परतणाऱ्या या प्रवाशांच्या महाराष्ट्रात सुखरूप परतण्यासाठी रेल्वे प्रवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी पाटणाहून नागपूरकडे सर्व भाविक सुखरूप रवाना झाले आहेत. त्यामुळे, संकटाच्या काळात तातडीने मदत केल्याबद्दल सर्व भाविकांकडून समाधान व्यक्त होत आहे.




काठमांडूमध्ये अडकलेल्या नागपूरच्या १०६ भाविकांची सुरक्षित देशवापसी झाली आहे, काही मोजके प्रवासी दिल्लीमार्गे तर उर्वरित बहुतांशी प्रवासी बिहारमधून रेल्वे मार्गे नागपूरला परतणार आहे. नेपाळमध्ये दर्शनासाठी गेलेले नागपूरचे १०६ भाविक काठमांडूमध्ये अडकले होते. काठमांडूमध्ये आलेल्या भीषण पुरामुळे भाविकांना परतीच्या प्रवासात अडचणी निर्माण झाल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नेपाळ प्रशासनाशी चर्चा करून भाविकांच्या सुरक्षित परतीची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. काठमांडू प्रशासनाने भाविकांसाठी ४ खासगी बस उपलब्ध करून दिल्या, सर्व १०६ भाविक शुक्रवारी काठमांडूहून सीतामढीसाठी रवाना झाले होते. सीतामढीहून बिहार सरकारच्या मदतीने सर्व भाविक रात्री पाटणा येथे पोहोचले. त्यापैकी ४ भाविक विमानाने दिल्लीला पोहोचले असून, तेथून केरळ एक्स्प्रेसने नागपूरकडे रवाना झाले. तर, उर्वरित १०२ भाविक शनिवारी पाटणा येथून रेल्वेने नागपूरसाठी रवाना झाले आहेत. लवकरच, ते आपल्या स्वगृही पोहोचणार आहेत.

**महाराष्ट्रातील ३७ भाविक मुंबईत परतणार**

कैलास मानसरोवर यात्रेतील ३७ भाविक आज मुंबईत परतणार आहेत. कैलास मानसरोवर यात्रेहून परतताना नेपाळच्या महाप्रलयानंतर तिबेटमधील सागा येथे महाराष्ट्रातील ३७ भाविक अडकले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारामुळे अडकलेल्या पर्यटकांना तातडीने मायदेशी आणण्यात आलं. काठमांडू येथून काही वेळातच ते मुंबईत दाखल होणार आहेत. भारतीय पर्यटकांच्या स्वागतासाठी भाजप आमदार मनिषा चौधरी, माजी नगरसेवक विनोद शेलार विमानतळावर उपस्थित आहेत.

## मुंबईत ३७ जण उतरले, कुटुंबीयांना आनंदाश्रू

**मुंबईतील डॉक्टर दाम्पत्याचा संपर्क तुटला**

मुंबईतील नामांकित रुग्णालयातील डॉक्टर दांपत्य नेपाळमध्ये गेल्यानंतर त्यांचा संपर्क तुटला होता. नेपाळमध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे गंभीर परिस्थिती उद्भवली असून मुंबईतील डॉक्टर दांपत्य नेपाळमध्ये अडकले असल्याची माहिती आहे. डॉ.आनंद देशपांडे आणि त्यांची पत्नी डॉ. गायत्री देशपांडे यांचा संपर्क तुटला आहे. डॉ. आनंद देशपांडे हिंदुजा रुग्णालयात रक्त संक्रमण शास्त्र विभागाचे प्रमुख आहेत. तर, डॉ. गायत्री देशपांडे नानावटी रुग्णालयाच्या प्रसूती व स्त्रीरोग विभागाच्या प्रमुख आहेत. हिल्स अँड ट्रेल्स टूर कंपनीमार्फत हे डॉक्टर दाम्पत्य नेपाळला गेले होते. बुधवारी सकाळी ८.२८ वाजता कुटुंबीयांशी शेवटचा संपर्क झाला.

# भिवापुरातील रकाड्यात युवकाचा खून, आरोपी स्वतःच पोलिसांना शरण

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

मैत्रीच्या नात्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना भिवापूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या खरकाडा येथे उघडकीस आली आहे. आपसी वादातून मित्रानेच २४ वर्षीय युवकाची निर्घृण हत्या करून त्याचा मृतदेह गावाबाहेरील झुडपात फेकून दिला. मयूर करपाते असे मृत युवकाचे नाव असून रामभाऊ नेवारे (४०) असे आरोपीचे नाव आहे. विशेष म्हणजे हत्या केल्यानंतर सहा दिवस लोटल्यावर आरोपीने स्वतःच चिमूर (जि. चंद्रपूर) पोलिस ठाण्यात शरण जात गुन्ह्याची माहिती दिली.

मयूर गेल्या आठवडाभरापासून बेपत्ता होता. तो रोजमजुरीच्या कामानिमित्त अधूनमधून घराबाहेर राहत असल्याने कुटुंबीयांना त्याच्या बेपत्ता होण्याचा संशय आला नाही. दरम्यान, गावाबाहेरील मंदिरामागील झुडपांमधून दोन-तीन दिवसांपासून दुर्गंधी येत होती. जवळच ढोरफोडीचा परिसर असल्याने मेलेल्या जनावरामुळे दुर्गंधी येत असावी, असा गावकऱ्यांचा समज होता. मात्र शनिवारी या दुर्गंधीमागचे भयावह सत्य समोर आले.



आरोपी रामभाऊ नेवारे शनिवारी दुपारी चिमूर पोलिस ठाण्यात पोहोचला आणि मयूरची हत्या केल्याची कबुली दिली. चिमूर पोलिसांनी तातडीने भिवापूर पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर पोलिसांनी खरकाडा येथे शोध घेतला असता झुडपात मयूरचा डोके धडापासून वेगळे केलेला कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला.

प्राथमिक माहितीनुसार, २३ ऑगस्ट रोजी मयूर आणि रामभाऊ यांच्यात काही कारणावरून वाद झाला होता. याच वादाचे पर्यवसान हत्येत झाले. हत्या केल्यानंतर आरोपीने पुरावा लपविण्याच्या उद्देशाने मृतदेह गावाबाहेरील झुडपात नेऊन टाकल्याचे समोर आले आहे. मात्र वादाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

घटनेची माहिती मिळताच भिवापूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार मस्कर यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. उमरेडचे उपविभागीय पोलिस अधिकारी मयंक माधव यांनीही घटनास्थळी भेट देऊन तपासाची माहिती घेतली. या निर्घृण हत्येमुळे खरकाडा परिसरात एकच खळबळ उडाली असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# बोगस पदवी रॅकेट प्रकरण : मास्टरमाईंडला नागपुरातून ठोकल्या बेड्या

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

नामांकित विद्यापीठांच्या ५ ते १० लाख रुपयांत बनावट पदव्या व गुणपत्रिका विकणाऱ्या रॅकेटच्या मास्टरमाईंडला पोलिसांनी नागपुरातून बेड्या ठोकल्या आहेत. परिमल बाबूराव गौरकर असं या आरोपीचं नाव आहे. त्याला नागपूरमधील हॉटेलमधून पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. यासोबतच बनावट स्टॅम्प व कागदपत्रं तयार करणाऱ्या त्याच्या नागपूरचा साथीदार अक्षय खोब्रागडे यालाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

बुधवारी दुगार्पूर पोलिसांनी बनावट पदवी विक्री प्रकरणी वैभव सोनुले याला अटक केली. मात्र या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार परिमल गौरकर हा फरार होता.



बनावट पदवी प्रकरणातील मास्टरमाईंड अक्षय खोब्रागडे याच्याकडं कॅनडातून मिळवलेली पीएचडी आहे. त्यानं ती ऑनलाइन शिक्षण घेऊन मिळवल्याचा दावा केला आहे. मात्र ही पीएचडी खरंच ऑनलाइन शिक्षण घेऊन मिळवली की रॅकेटचा वापर करून तयार केली, याबाबतचा तपास चंद्रपूर पोलीस करत आहेत.

**कुलगुरू म्हणतात, पदवी, कागदपत्रं बनावट**

दुर्गापूर पोलिसांनी जप्त केलेल्या सर्व पदवी, गुणपत्रिका व कागदपत्राबाबत सहा विद्यापीठांना गुरुवारी पत्र पाठवून अहवाल मागितला होता. शुक्रवारी काही विद्यापीठातील कुलगुरूंनी त्या डिग्री व कागदपत्रांबाबत माहिती दिली. या पदव्या आणि कागदपत्र बनावट असल्याचं या कुलगुरूंनी पोलिसांना तोंडी सांगितलं आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

**कोठडीतून होणार उलगडा**

पदवी प्रकरणातील मास्टरमाईंड परिमल गौरकर आणि बनावट कागदपत्रं छापणारा अक्षय खोब्रागडे या दोघांनाही अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयात हजर करून पोलीस कोठडी मागण्यात आली आहे. चौकशीदरम्यान या दोघांनी आतापर्यंत किती जणांना अशा प्रकारे बोगस पदव्या विकल्या, या रॅकेटमध्ये आणखी कोणाकोणाचा सहभाग आहे, या बोगस पदव्यांच्या आधारे कोणी सरकारी वा खासगी नोकरी मिळवली आहे का, याचे मोठे नेटवर्क उघड होण्याची शक्यता आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक संतोष शेगोकार यांनी दिली.

संपादकीय लेखणीतून...

## सी-व्होटरचा मुड

देशात आज लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या तर भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) पुन्हा एकदा सत्तेवर येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. इंडिया टुडे आणि सी-व्होटरच्या ताज्या मुड ऑफ द नेशन जनमत चाचणीनुसार एनडीएला ३२६ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवला गेला आहे. जानेवारी महिन्यातील सर्वेक्षणात एनडीएला ३५२ जागा मिळतील, असा अंदाज होता. त्या तुलनेने आता २६ जागांची घट झाली आहे मात्र २०२४ च्या तुलनेत मतदारांचा विश्वास कायम असल्याचे दिसून येत असून २०२९ च्या निवडणुकांआधी सत्ताधाऱ्यांसमोर तरुणांच्या असंतोषाचे नवे आव्हान उभे राहिले आहे. दुसऱ्या बाजूला, विरोधी इंडिया आघाडीला या सर्वेक्षणात १८५ जागा मिळण्याची शक्यता आहे जी जानेवारीच्या अंदाजापेक्षा फारशी वेगळी नाही. पक्षनिहाय आकडेवारीचा विचार केल्यास भाजप आणि काँग्रेसच्या समीकरणांमध्ये लक्षणीय बदल दिसत आहेत. आज निवडणूक झाल्यास भाजपला २६१ जागा मिळण्याचा अंदाज आहे. ६ महिन्यांपूर्वी वर्तवण्यात आलेल्या २८७ जागांच्या तुलनेत ही मोठी घसरण आहे.

त्यामुळे भाजप बहुमताच्या २७२ या जादुई आकड्यापेक्षा थोडा मागे राहताना दिसत असला तरी २०२४ च्या प्रत्यक्ष २४० जागांपेक्षा हा आकडा जास्त आहे. देशभरातील पेपरफुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील गोंधळामुळे तरुण पिढीमध्ये असलेला संताप भाजपला भोवताना दिसत आहे. दिल्लीतील आंदोलनानंतर शिक्षणमंत्र्यांना द्यावा लागलेला राजीनामा हा याच नाराजीचा भाग मानला जात आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आक्रमकपणे उचलून धरलेल्या मुद्द्यांचा काँग्रेसला फायदा होताना दिसत आहे. पक्षाला १०६ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून जानेवारीतील ८० जागांच्या तुलनेत काँग्रेसने मोठी आघाडी घेतली आहे.

मतांच्या टक्केवारीत दोन्ही आघाड्यांमध्ये तुल्यबळ लढत दिसत आहे. एनडीएच्या मतांची टक्केवारी जानेवारीतील ४७ टक्क्यांवरून घसरून ४५.१ टक्क्यांवर आली आहे. २०२४ च्या प्रत्यक्ष निवडणुकीत एनडीएला ४४ टक्के मते मिळाली होती. विरोधी आघाडीला ३९.१ टक्के मते मिळण्याची शक्यता असून जानेवारीच्या ३९ टक्क्यांच्या तुलनेत यामध्ये किंचित वाढ झाली आहे. या सर्वेक्षणासाठी जुलै ते २५ ऑगस्टदरम्यान २५,१८४ लोकांचे मत जाणून घेण्यात आले तर गेल्या ६ महिन्यांतील ९१,७९५ मुलाखतींचा आधार घेण्यात आला आहे. अलिकडे उदयास आलेल्या कॉक्रोच जनता पक्षामुळे देशातील राजकारण कमालीचे ढवळून निघाले आहे. त्यांनी देशभरातील तरुणाईला एकत्र आणण्याचे मोठे काम केले आहे. त्यातून सरकारविरोधी वातावरण तयार होत असल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. वाढत्या बेरोजगारीच्या समस्येमुळे तरुणाई त्रस्त आहे. त्यांना भविष्यातील अंधार स्पष्टपणे दिसत आहे. त्याच्याच बरोबरीने काँग्रेसचे नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काढलेली भारत जोडो पदयात्रा ही त्यांच्यासाठी मैलाचा दगड पार करणारी ठरली. ज्याच्या माध्यमातून त्यांनी देशातील धार्मिक द्वेष कमी करत प्रेम व आपुलकीतून माणसांना जोडण्याचे अवघड काम केले तरीही सत्ताधाऱ्यांनी त्यांची पप्पू म्हणत टिंगल टवाळी करण्याचा प्रयत्न केला. त्यांची राजकीय कोंडी करण्याचाही प्रयत्न झाला; पण ते घाबरले नाहीत. ते न डगमगता संघर्ष करून आजही ठामपणे उभे आहेत.

त्यांनी छात्रों की गुंज कार्यक्रम सुरू करून तरुणाईच्या भावनेला हात घातला आहे. अख्खी जेन-झी त्यांच्यावर जाम खुश आहे. आपल्या समस्येला वाचा फोडणारा निर्भिड नेता मिळाल्याचा आनंद आणि विश्वास त्यांना मिळाला आहे त्यामुळे सत्ताधारी कमालीचे हादरले आहेत. राहुल गांधींना रोखणे अवघड जाईल या भीतीने सत्ताधाऱ्यांची गाळण उडाली आहे. सत्ताधाऱ्यांविषयीची नाराजी चव्हाट्यावर आणण्याचे काम राहुल गांधींनी केले आहे. कोटा, प्रयागराज, डेहराडून आणि पुणे येथे तरुणाईने राहुल गांधींना दिलेला प्रतिसाद पाहता हे मेळावे प्रचंड यशस्वी झाल्याचे दिसून येते. आता महाराष्ट्रात नाशिक, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर या जिल्ह्यातही अशा मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार आहे म्हणे!

# झुंडशाहीचा वाढता विळखा: पायदळी तुडवली जाणारी मानवी प्रतिष्ठा !

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

झुंडशाही हा सध्याच्या समाजासमोरील एक अत्यंत गंभीर आणि चिंताजनक प्रश्न बनला आहे. जेव्हा एखादा जनसमुदाय कायदा, सुव्यवस्था आणि मानवी मूल्यांना बाजूला सारून स्वतःच्या हातात कायदा घेतो, तेव्हा त्याला झुंडशाही म्हणतात. आजच्या डिजिटल आणि वेगवान युगात झुंडशाहीचा विळखा अधिकच घट्ट होत चालला असून, यामुळे मानवी प्रतिष्ठेचा सर्रास संहार होत आहे.

पुरोगामी विचार आणि सामाजिक न्यायाचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्राला नुकत्याच जालन्यात घडलेल्या एका अमानुष घटनेने हादरवून सोडले आहे. गोरक्षेच्या नावाखाली काही स्वयंघोषित गुंडांनी कायदेशीर कागदपत्रे असलेल्या एका दलित वाहनचालकाला अडवून अमानुष मारहाण केली आणि जबरदस्तीने त्याला शेण खाण्यास भाग पाडले. अत्यंत संतापजनक बाब म्हणजे, मानवी क्रूरतेचा कळस गाठणारी ही घटना पीडिताच्या ११ वर्षांच्या निष्पाप मुलासमोर घडली. केवळ जातीच्या आणि संशयाच्या आधारे करण्यात आलेला हा हल्ला केवळ एका व्यक्तीवरील अत्याचार नाही, तर तो भारतीय संविधानाने दिलेल्या मानवी प्रतिष्ठेवर आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांवर झालेला थेट आघात आहे. गुन्हेगारांनी या क्रूरतेचे चित्रीकरण करून सोशल मीडियावर प्रसारित करणे आणि शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन करत दहशत माजवणे, हे व्यवस्थेला दिलेले उघड आव्हान आहे. अशा भयाच्या वातावरणात 'सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया' सारख्या संघटनांनी पीडित कुटुंबाला दिलेला आधार आणि कायदेशीर मदत महत्त्वाची ठरते, कारण ती अशा अंधारात न्यायाची आशा पल्लवित करते.

या घटनेने 'कायद्याचे राज्य विरुद्ध झुंडशाही' असा अत्यंत गंभीर प्रश्न आपल्यासमोर उभा केला आहे. कोणत्याही निरोगी लोकशाहीत न्यायदानाचे काम हे न्यायालयांचे आणि कायदा सुव्यवस्थेचे काम पोलिसांचे असते. परंतु, जेव्हा रस्त्यावरील जमाव स्वतःच न्यायाधीश आणि जल्लाद बनतो, तेव्हा तो संविधानाचा सर्वात मोठा अवमान ठरतो. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ नुसार देशातील प्रत्येक नागरिकाला सन्मानाने आणि प्रतिष्ठेने जगण्याचा मूलभूत अधिकार आहे. गोरक्षेच्या किंवा धर्मरक्षणाच्या नावाखाली एखाद्या नागरिकाला रस्त्यात अडवून त्याची मानवी प्रतिष्ठा पायदळी तुडवण्याचा अधिकार या स्वयंघोषित रक्षकांना कोणी दिला? हा प्रश्न व्यवस्थेने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. प्रशासनाने आणि व्यवस्थेने यावर मूकदर्शकाची भूमिका घेणे, हे गुन्हेगारांना दिलेली छुपी संमतीच असते. जर अशा झुंडशाहीचा वेळेत कठोर हाताने बीमोड झाला नाही, तर सामान्य माणसाचा, विशेषतः वंचित आणि अल्पसंख्याक घटकांचा, न्यायव्यवस्थेवरील विश्वास पूर्णपणे डळमळीत होईल.

झुंडशाही आणि द्वेषपूर्ण गुन्हे ही केवळ कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या नसून ती समाजाच्या मानसिकतेत खोलवर रुजलेल्या विषमतेची आणि असहिष्णुतेची लक्षणे आहेत. यावर कायमस्वरूपी तोडगा काढायचा असेल, तर केवळ कायद्याच्या बडग्यावर अवलंबून राहता येणार नाही; त्याची सुरुवात मुळापासून करावी लागेल. शालेय शिक्षणातूनच विद्यार्थ्यांमध्ये समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही संविधानिक मूल्ये रुजवणे आवश्यक आहे. दुसऱ्याच्या जागी स्वतःला उभे करून पाहण्याची सहानुभूती आणि कोणत्याही माहितीवर आंधळा विश्वास न ठेवता तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता लहानपणापासूनच विकसित करणे काळाची गरज आहे.

याव्यतिरिक्त, तळागाळात सामाजिक संवादाची निर्मिती करणे ही सद्यस्थितीतील सर्वात मोठी आवश्यकता आहे. विविध जाती, धर्म आणि समुदायांमध्ये असलेला संवादाचा अभाव हा गैरसमज आणि द्वेषाला खतपाणी घालतो. हे रोखण्यासाठी गाव आणि वॉर्ड पातळीवर सर्वसमावेशक 'शांतता व सलोखा समित्या' अधिक सक्रिय केल्या पाहिजेत. आजच्या डिजिटल युगात समाज माध्यमे द्वेष आणि अफवा पसरवण्याचे सर्वात मोठे हत्यार बनली आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये 'माध्यम साक्षरता' निर्माण केल्याशिवाय या द्वेषाच्या साखळीला आळा बसणार नाही.

जोपर्यंत शासन आणि प्रशासन अशा झुंडशाही प्रवृत्तींचा अत्यंत कठोर हाताने बिमोड करत नाहीत, तोपर्यंत 'पुरोगामी राज्य' ही संकल्पना केवळ पोकळ शब्द राहील. गुन्हेगारांना मिळणारा राजाश्रय थांबवून जलदगती न्यायालयांद्वारे अशा प्रकरणांचा निकाल लावणे आवश्यक आहे. मात्र, त्याचवेळी समाजाची प्रगल्भता वाढवून तळागाळातून सामाजिक सलोख्याची बांधणी करणे हाच या समस्येवरील शाश्वत उपाय आहे.

तरुणाईची ऊर्जा हिंसक आणि द्वेषपूर्ण कृत्यांकडे वळण्यापासून रोखण्यासाठी त्यांना प्रत्यक्ष लोकशाही प्रक्रियेत आणि विधायक कामांत सामावून घेणे अत्यंत आवश्यक आहे. या विधायक उपक्रमांमध्ये स्थानिक तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग वाढवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. मतदार जागृती मोहिमा, युवा संसद, संवाद कट्टे आणि सर्वसमावेशक सामुदायिक सेवा प्रकल्पांच्या माध्यमातून तरुणांना एकत्र आणल्यास, त्यांच्यातील पूर्वग्रह दूर होऊन सहिष्णुता आणि सामाजिक सलोखा वाढीस लागतो. या विधायक मार्गांमुळे भरकटलेल्या मनांना योग्य दिशा मिळते आणि झुंडशाहीसारख्या प्रवृत्तींना आळा बसून एक सशक्त व प्रगल्भ समाज घडण्यास नक्कीच मदत होते.

मानवी प्रतिष्ठा हा कोणत्याही सुसंस्कृत समाजाचा आत्मा असतो. जोपर्यंत आपण एक समाज म्हणून 'जमावाच्या मानसिकते'तून बाहेर पडून 'कायद्याचे राज्य' आणि 'मानुसकी'चा आदर करत नाही, तोपर्यंत झुंडशाहीचा हा विळखा सैल होणार नाही. लोकशाही टिकवण्यासाठी झुंडशाहीचा वेळीच बिमोड करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे

- ९५६१५९४३०६

# पंचतारांकित सवयी आणि मैदानावरचा 'तंबू': आशियाई खेळांत भारतीय क्रिकेटपटूंची खरी कसोटी

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

आयपीएलच्या झगमगाटात आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या पंचतारांकित वातावरणात वावरणाऱ्या भारतीय क्रिकेटपटूंसाठी आशियाई क्रीडा स्पर्धा म्हणजे एक मोठा 'कल्चरल शॉक' ठरण्याची चिन्हे आहेत. चार्टर्ड विमाने, आलिशान प्रेसिडेन्शियल सूट्स आणि बोटाच्या एका इशाऱ्यावर हजर राहणाऱ्या सुखसोयींची सवय असलेल्या या खेळाडूंना जपानमधील आयची-नागोया येथे अगदी प्राथमिक सुविधांशी जुळवून घ्यावे लागणार आहे.

### आलिशान जीवनशैली विरुद्ध जपानी वास्तव

भारतीय क्रिकेटपटूंच्या रोजच्या जगण्यात आणि ऑलिम्पिक किंवा आशियाई खेळांसारख्या बहुक्रीडा स्पर्धांच्या वातावरणात जमीन-आसमानाचा फरक आहे:

तंबूतले ड्रेसिंग रूम्सः नेहमी वातानुकूलित आणि आलिशान ड्रेसिंग रूममध्ये बसणाऱ्या खेळाडूंसाठी तात्पुरत्या तंबूंमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. वॉशरुमची ५०० मीटरची कसरतः पॅड आणि ग्लोव्हज घालून बसलेल्या खेळाडूंना स्वच्छतागृहासाठी तब्बल अर्धा किलोमीटर चालत जावे लागणे ही त्यांच्यासाठी केवळ गैरसोय नसून एक वेगळीच शारीरिक परीक्षा ठरेल.

आटोपशीर खोल्याः जपानमधील प्रसिद्ध मिनिमलिस्टिक आणि लहान आकाराच्या हॉटेलच्या खोल्यांमध्ये ६ फुटांपेक्षा जास्त उंची असलेल्या आणि अवाढव्य किटबॅग्ज घेऊन फिरणाऱ्या क्रिकेटपटूंची होणारी तारांबळ पाहण्यासारखी असेल.

### खेळाडूंची होणारी संभाव्य गडबड

श्रेयस अय्यर, जसप्रीत बुमराह किंवा इशान किशन यांसारख्या खेळाडूंना अशा वातावरणात खेळण्याचा सराव राहिलेला नाही. सामन्यादरम्यान रणनीती आखण्याऐवजी वॉशरुमला जायला किती वेळ लागेल किंवा लहान खोलीत किटबॅग कशी साठवायची यांसारख्या प्राथमिक गोष्टींवरून खेळाडूंची चिडचिड आणि गडबड उडणे स्वाभाविक आहे. मानसिक एकाग्रतेवर अशा असुविधांचा थेट परिणाम होऊ शकतो.

### सुविधांचा दुष्काळ आणि अपेक्षांचा डोंगरः जपानमधील मैदानावरील काही उपरोधिक पैलू

प्रायव्हेट शेफ विरुद्ध कॅन्टीनचे जेवणः भारतीय क्रिकेटपटूंचे खाण्यापिण्याचे काटेकोर डाएट, त्यांचे वैयक्तिक शेफ आणि विशिष्ट आहाराच्या सवयी जगजाहीर आहेत. आशियाई खेळांच्या व्हिलेजमध्ये मात्र सर्वांसाठी समान मेस किंवा मर्यादित मेनू असतो. प्रोटिन शेक, सप्लिमेंट्स आणि आवडीच्या जेवणासाठी होणारी धावपळ खेळाडूंच्या दिनक्रमावर परिणाम करू शकते.

किट्स, मसाज आणि रिकव्हरीचे आव्हानः आंतरराष्ट्रीय सामन्यांनंतर खेळाडूंसाठी आइस बाथ, स्टीम, अत्याधुनिक फिजिओ रूम्स आणि रिकव्हरी सेंटर्स लगेच उपलब्ध असतात. जपानमधील प्राथमिक तंबू व्यवस्थेमुळे दुखापतींचे व्यवस्थापन करणे आणि सलग सामन्यांमध्ये ताजेतवाने राहणे सपोर्ट स्टाफसाठी मोठी डोकेदुखी ठरेल.

सोशल मीडिया आणि 'रील' संस्कृतीला सुरुंगः खेळाडूंचे आलिशान हॉटेल व्ह्यूज आणि लाइफस्टाइल व्लॉग्स सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असतात. इथे मात्र साध्या रूम्स आणि मर्यादित जागा पाहून खेळाडूंच्या ऑफ-द-फिल्ड ग्लॅमरला काही काळासाठी विश्रांती मिळणार आहे.

### बीसीसीआयची नाराजी आणि प्रशासकीय पेच

इन्स्पेक्टरची नियुक्तीः बीसीसीआयने त्वरित निरीक्षक पाठवण्याचा घेतलेला निर्णय बोर्डाच्या अस्वस्थतेची तीव्रता दर्शवतो. खेळाडूंच्या सुरक्षेशिवाय त्यांच्या आरामदायी वातावरणाला धक्का पोहोचल्यास त्याचा थेट परिणाम कामगिरीवर होतो, ही बोर्डाचीद मुख्य भीती आहे.

इतर देशांशी तुलनाः ऑलिम्पिक खेळांत नेहमीच सहभागी होणाऱ्या इतर क्रीडा प्रकारांतील खेळाडू अशा व्यवस्थेला सरावलेले असतात. मात्र, क्रिकेटपटूंसाठी निर्माण झालेला हा वाद इतर खेळाडूंच्या नजरेत "क्रिकेटपटूंचे चोचले" असाही पाहिला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### खेळाडूंसाठी आत्मपरीक्षणाची संधी

गल्ली क्रिकेट किंवा स्थानिक स्पर्धांच्या (जसे की रणजी ट्रॉफीचे साधे दौरे) दिवसांची आठवण करून देणारी ही परिस्थिती ठरू शकते. यश आणि प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचल्यानंतर जमिनीवरच्या वास्तवाशी पुन्हा जोडले जाणे, ही नकारात्मक बाब नसून खेळाडूंसाठी एक मानसिक ताकद बनू शकते. प्रतिकूल परिस्थितीतही सर्वोत्तम कामगिरी करून सुवर्णपदक पटकावणे हीच या भारतीय संघाची खरी ताकद ठरेल.

### परिस्थितीशी जुळवून घेणेः खरी खेळाडूवृत्ती

क्रिकेट हा केवळ मैदानावर चौकार-षटकार मारण्याचा खेळ नाही, तर तो मानसिक कणखरतेचीही परीक्षा पाहतो. क्रिकेटपटूंनी या स्पर्धेत हे लक्षात ठेवणे गरजेचे आहेः

ऑलिम्पिक स्पिरिटः इतर खेळांतील अँथलीट्स वर्षानुवर्षे अत्यंत खडतर आणि मर्यादित साधनांमध्ये देशासाठी पदके जिंकत असतात. क्रिकेटपटूंनीही त्याच खेळाडूवृत्तीने या परिस्थितीकडे पाहिले पाहिजे.

सुवर्णपदकाचे लक्ष्यः मैदानाबाहेरील असुविधा विसरून जर खेळाडूंनी मैदानावर लक्ष केंद्रित केले, तरच गतविजेतेपद राखणे शक्य होईल.

पंचतारांकित सोयी-सुविधांची चौकट मोडून जमिनीवरच्या वास्तववादी सुविधांशी कोण किती लवकर जुळवून घेतो, यावरच भारताच्या मोहिमेचे यश अवलंबून असेल. ही स्पर्धा भारतीय क्रिकेटपटूंच्या कौशल्यासोबतच त्यांच्या संयमाची आणि जुळवून घेण्याच्या क्षमतेची सर्वात मोठी कसोटी ठरेल.

- ९०९६३७२०८२

# पेपरफुटीचे प्रकार आस्मानावर आणि विद्यार्थ्यांच्या समस्या वाऱ्यावर, विद्यार्थ्यांनी जगावे की मरावे!

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

देशासह राज्यातील पेपर फुटी प्रकरणामुळे तरुण युवकांपुढे मोठ्या गंभीर आणि जटिल समस्या निर्माण झाल्या असून सरकारने त्यांना द्विधा मनस्थितीत नेऊन ठेवले आहे.त्यामुळे देश कुठे चालला हे कळता-कळेना एवढी मोठी भयावह परिस्थिती सरकारने युवा पिढीच्या बाबतीत देशात निर्माण करून ठेवली आहे.त्यामुळे सरकार तुपाशी आणि बेरोजगार युवक उपाशी अशी गंभीर समस्या सरकारने निर्माण केली आहे.त्यामुळे युवकांपुढे एकीकडे "विहिर तर दुसरीकडे खाई"अशी परिस्थितीत निर्माण झाली आहे. त्यामुळे "जाये तो जाये कहा" अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे.

राज्यातील एमपीएससी पेपर फुटीमुळे असह्य वेदना होत असुन नौकरीच्या बाबतीत तरूणांचा सरकारवरील विश्वास हळूहळू कमी होतांना दिसत आहे. कारण नीट,सीईटी, टीईटी,न्यायपालिकेतील "टायपिंग स्किल" परीक्षा, औषध निरीक्षक पदभर्ती पाठोपाठ आता "एक्साईट" चाही मार्किंग पॅटर्न आणि पेपर फुटीचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे.यावरून स्पष्ट होते की,राज्यात सर्वच स्तरावरील पेपर फुटीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असून सर्वत्र जनूकाय अंधकार निर्माण झाला की काय असे सर्वत्र वातावरण दिसत आहे.कारण पेपर फुटीमध्ये पेपर काढणारे व राजकीय पुढारी यांची सर्वांचीच मिलीभगत असल्याचे दिसून येते त्यामुळेच हा प्रकार होत असावा किंवा सरकारी नौकरी भरतीच्या नावाखाली तरूणांची सरकार दिशाभूल तर करीत नाही ना असाही प्रश्न उपस्थित होत आहे.राज्यात वारंवार होत असलेल्या पेपर फुटीचा किंवा नौकरी भरतीचा होत असलेला गोंधळ पहाता असे वाटते की, राज्यातील सरकारी नौकरी भरती ही सरकारचे नाटक तर नाही ना! वारंवार पेपर फुटीच्या प्रकरणावरून असे वाटते की, सरकारला सरकारी नौकऱ्यांच्या रीक्त जागा भरायच्या आहे की नाही यात राज्याच्या जनतेच्या मनात शंका निर्माण होत आहे.

कारण राज्यासह देशात सत्तेसाठी पक्ष फुटतांना आपण अनेकदा पाहिले आणि हा प्रकार नेहमीच होत असतो.परंतु सध्या राज्यात सर्वच स्तरावरील पेपर वारंवार फुटत आहेत.यामुळे विद्यार्थ्यांची मानसिकता खालावली असून त्यांच्या आयुष्यावर घणाघाती प्रहार होत आहे व अनेक जण डिप्रेशनमध्ये गेल्याचे दिसून येते.विद्यार्थांचा पेपर होतो पेपर चांगले जातात आणि नंतर अचानक पेपर फुटतो याला तर अजीबोगरीब कहानी म्हणावी लागेल.त्याचप्रमाणे हायकोर्टाच्या परिक्षेत ११५९२२ उमेदवार परीक्षा देतात त्यातून टायपिंग परीक्षेसाठी मेहनतीच्या बळावर राज्यात ११६१७ उमेदवार पात्र ठरतात आणि याही ठिकाणी सर्वच सेंटरवर मोठ्या प्रमाणात उमेदवार गोंधळतात यावरून स्पष्ट होते की, परीक्षा व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात तांत्रिक तृटी निर्माण होते व ज्यांना २० पैकी १० ते १५ मार्क मिळण्याची शक्यता असते त्यांना फक्त १ ते ५ मार्क मिळतात ही कसली परीक्षा पध्दत म्हणावी?

हायकोर्टाच्या टायपिंग टेस्टच्या बाबतीत असेही सांगितले जाते की काही ठिकाणी टायपिंग टेस्टचा पेपर फुटल्याचे सांगितले जाते.अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी किंवा बेरोजगार तरुणांनी कोणावर विश्वास ठेवावा यावर सुद्धा सरकारच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित होतो.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बाबतीत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की,"जाये तो जाये कहा" अशी कठीण समस्या दिसून येते.एमपीएससी परीक्षा नेहमी पारदर्शी पद्धतीने व्हायची आणि त्यावर सर्वांचाच विश्वास होता.परंतु आता यातही मोठे भगदाड पडले असुन पेपरफुटी दिसून आली हे राज्याच्या विद्यार्थ्यांच्या व बेरोजगार तरुणांनांच्या दृष्टीने अत्यंत दुर्भाग्यपूर्ण व दुःखद बाब आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने खाद्य एवं औषधी प्रशासन विभाग यामध्ये औषधी निरीक्षक (डीआई) समूह -बी या पदाचा पेपर फुटल्याने औषधी निरीक्षक भर्ती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे.

असे सांगितले जाते की,औषधी निरीक्षक भर्ती परीक्षेची प्रश्नपत्रिका राज्यभरात सक्रिय एजंट मार्फत उमेदवारांना ४०-४० लाख रूपयांत विकण्यात आल्याचे सांगितले जाते. आज राज्यात सरकारी नौकरीच्या लाखो जागा खाली आहेत.परंतु सरकारची नियत साफ नसल्याचे पेपर फुटीचा घृणास्पद प्रकारावरून दिसून येते.हा सर्व प्रकार सरकार आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.परंतु गुन्हेगारांवर कठोर शिक्षा किंवा फाशी होत नाही हे राज्याचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.औषध निरीक्षक पाठोपाठ आता "एक्साईज" चाही मार्किंग पॅटर्न आणि पेपर फुटीचा खळबळजनक आरोप होत आहे. यावरून स्पष्ट होते की राज्यात नौकरी भरतीच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असुन सरकार फक्त चौकशीची भाषा किंवा समिती तयार करून हात झटकण्याचे काम करीत आहेत ही तरुण युवकांसाठी मोठी समस्या निर्माण झाली आहे.

कारण राज्यात पेपर फुटीचे प्रकार दिवसेंदिवस वाढतच आहे; राज्यात पेपर फुटीवरून असे निदर्शनास येते की, सरकारला रीक्त पदे भरायचेच नाही की काय! असे दिसून येते.

अशा परिस्थितीत योग्यता प्राप्त विद्यार्थ्यांचा यात नंबर लागणार की नाही हाही प्रश्नच आहे.वरील प्रकरणामुळे सरकारने विद्यार्थ्यांच्या भविष्यापूढे मोठे प्रश्न चिन्ह निर्माण केला आहे. कारण सध्याच्या परिस्थितीत सरकार देशातील आणि राज्यातील राजकारणात पक्ष फुटी,आमदार-खासदार फुटी यावर अवलंबून आहे.त्याचीच पुनरावृत्ती सरकार पेपर फुटीच्या माध्यमातून तरूण विद्यार्थ्यांची व बेरोजगार युवकांची अवहेलना करून स्लोपॉयझनच देण्याचे काम सरकार करीत आहे.अशा गंभीर परिस्थिती अनेक बेरोजगार युवावर्ग डिप्रेशनमध्ये जाऊ शकतो यालाही नाकारता येत नाही. राज्यासह देशात जेन-झी व जेन अल्फांचे हालबेहाल होत आहे, तर दुसरीकडे सरकारने सुभाष चंद्रांना २२ हजार कोटींची कर्जमाफी जाहीर केल्याचे सांगितले जाते.

यामुळे कर्ज देणारी एचडीएफसी बँक व एलआयसी सरकारवर आक्रमक झाल्याचे दिसून येते.हाच पैसा सरकारने शाळा महाविद्यालये किंवा आरोग्य सुविधांसाठी वापरला असता तर देशाचा विकास झाला असता.

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# गणेशोत्सव पर्यावरणपूरक व समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करा !

## गणेशोत्सव मंडळ आणि स्वयंसेवी संस्थांच्या बैठकीत मान्यवरांचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिका, पोलीस आयुक्तालय आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त समन्वय बैठक रेशीमबाग स्थित कविवर्य सुरेश भट सभागृहात शनिवारी (ता.२९) पार पडली. बैठकीत सर्व गणेशोत्सव मंडळानी आपल्या मंडळात समाजोपयोगी उपक्रम राबवीत पर्यावरणपूरक असा गणेसोत्सव साजरा करण्याचे आवाहन मान्यवरांनी केले. यावेळी बैठकीला महापौर निता ठाकरे, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, आयुक्त डॉ. विपीन, पोलीस सह पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेंद्र दाभाडे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, अपर पोलीस आयुक्त विनीता साहू, वसंत परदेशी, पोलिस उपायुक्त अन्नपूर्णा सिंह, पोलीस उपायुक्त ऋषिकेश रेड्डी, एन.राश्मिता राव, रमेश धुमाळ, पोलिस उपायुक्त संदीप पाखले, पोलिस उपायुक्त राहुल माखनीकर, दीपक अग्रवाल, आदित्य मिरखेलकर, मनपाचे अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त राजेश भगत, मुख्य अभियंता लीना उपाध्ये, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्यासह विविध गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



**सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे : महापौर**

उपस्थितांना मार्गदर्शन करीत महापौर निता ठाकरे यांनी सांगितले की, श्रीगणरायाच्या आगमनाने संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गणेशोत्सवादरम्यान नागरिकांना अडचण होणार नाही याची दक्षता घेत मंडळांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्यात येणार आहे. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे असे आवाहन केले.


**युवकांना सकारात्मक दिशा देणारा गणेशोत्सव : पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील**

पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी गणेशोत्सव हा सामाजिक ऐक्य आणि नवीन नेतृत्व घडविणारा उत्सव असल्याचे सांगत प्रत्येक मंडळाने स्वयंसेवकांची सक्षम व्यवस्था ठेवावी, महिलांच्या व बालकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, ध्वनीप्रदूषणासंदभार्तील नियमांचे पालन करावे, रचनात्मक आणि समाजाला अभिप्रेत असणारा गणेशोत्सव साजरा करावा, तसेच मंडळानी सर्वांसाठी व्यसनमुक्ती, रक्तदान व समाजप्रबोधनाचे उपक्रम मंडळात गणेशोत्सवादरम्यान राबवावे, जेणेकरून यंदाचा गणेशोत्सव हा युवकांना सकारात्मक दिशा देणारा गणेशोत्सव ठरेल असे आवाहन केले.

**सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा उपयोग करा : आयुक्त डॉ. विपीन**

मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी बैठकीत गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मनपाद्वारे करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली, तसेच गणेशोत्सवादरम्यान नागरिकांनी मनपाच्या आपली बस, मेट्रो सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा उपयोग करण्याचे आवाहन केले. याशिवाय त्यांनी मंडळांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबीर करण्याचे ही आवाहन केले. बैठकीत मंडळांद्वारे प्राप्त सूचनांवर तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश संबंधित अधिकारी यांना दिले. गणेशोत्सवादरम्यान मनपाद्वारे स्वच्छतेची उत्तम काळजी घेण्यात येईल असे आश्वासित करीत त्यांनी मंडळानी देखील त्यांच्या कचरा व निर्माल्य एकाच ठिकाणी जमा करावे, मनपाद्वारे दिवसातून दोन वेळा कचरा संकलन करण्यात येईल.

## पीआरएसएसईचे युवा वैज्ञानिक राष्ट्रीय 'अन्वेषणा २०२६'मध्ये चमकले



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या प्रा. राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरी (पीआरएसएसई)च्या युवा विद्यार्थी संशोधकांनी बंगळुरू येथील प्रयागा इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन रिसर्चमध्ये आयोजित प्रतिष्ठित राष्ट्रीय संशोधन इंटर्नशिप कार्यक्रम 'अन्वेषणा २०२६'मध्ये उल्लेखनीय यश मिळवत शहराचा गौरव वाढविला आहे. राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत विद्यार्थी संशोधक अनन्या व्यवहारे आणि तिच्या टीमने प्रकल्प सादरीकरणात प्रथम क्रमांक पटकावला. देशभरातील ६१ विद्यार्थी वैज्ञानिकांनी सादर केलेल्या २० प्रकल्पांमध्ये त्यांच्या प्रकल्पाने बाजी मारली. याचबरोबर मास्टर अभिराम बारोकरने पोस्टर सादरीकरणात प्रथम पारितोषिक मिळविले. अनन्या आणि अभिराम हे दोघेही सोमलवार ग्रुप ऑफ स्कूल्सचे विद्यार्थी आहेत. प्रा. राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरीच्या मार्गदर्शनामुळे त्यांना या संशोधनाच्या संधीचा लाभ घेता आला. उन्हाळ्याच्या सुट्टीत त्यांनी प्रयागा इन्स्टिट्यूटमध्ये वैज्ञानिकांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन प्रकल्पांवर काम केले. यामुळे त्यांना प्रत्यक्ष प्रयोग आणि वैज्ञानिक संशोधनाचा अनुभव मिळाला.

या यशाबद्दल प्रा. राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरीच्या संचालक डॉ. सीमा उबाळे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रयोगांवर आधारित छोटे प्रकल्प हाती घेऊन संशोधनाभिमुख निष्कर्ष साधण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले. युवा विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक चौकशीची संस्कृती रुजविणे हे अर्थपूर्ण नवकल्पनांना चालना देण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

## धंतोली, व्हीसीए, राजाराणी चौक व व्हीएनआयटी परिसरातील अतिक्रमणावर धडक कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या धरमपेठ झोन तसेच लक्ष्मीनगर झोन अंतर्गत धंतोली परिसरातील वाहतूकीस निर्माण होणाऱ्या रस्त्यावरील अळथळे निर्माण करणाऱ्या रस्त्यावरील अतिक्रमणे करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध मोठ्या प्रमाणात संयुक्त अतिक्रमण कारवाई करण्यात आली. सदर कारवाई आयुक्त, नागपूर महानगरपालिका, पोलीस आयुक्त तसेच पोलीस उपायुक्त (वाहतूक) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईदरम्यान धंतोली परिसरातील रस्ते, दवाखाने व रुग्णालयांच्या आजूबाजूचा रस्ते परिसर मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त केले आहे.

# वृक्षाची रक्षा व संवर्धन करण्यासाठी भगवान श्रीकृष्ण बना : मुख्य अभियंता विवेक रोकडे

## वृक्षाला राखी बांधून पर्यावरण रक्षणाचा दृढ संकल्प

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

रक्षाबंधन सण हा केवळ धाग्याचा सण नसून बहीण-भावाच्या मनातील प्रेम, आदर आणि विश्वासाचे प्रतीक आहे. रक्षाबंधन म्हणजे संरक्षणाचे बंधन.

ज्याप्रमाणे भगवान श्रीकृष्णांच्या हाताच्या बोटाला जखम झाली होती हे पाहून द्रौपदीने लगेच आपल्या साडीचा एक भाग फाडून त्यांच्या हाताला बांधून दिला आणि त्या दिवसापासून भगवान श्रीकृष्णांनी द्रौपदीचे जीवनभर रक्षा करण्याचा संकल्प केला, असाच संकल्प वृक्षाची संरक्षण व संवर्धन करण्यासाठी आपणही भगवान श्रीकृष्ण बना, असे आवाहन मुख्य अभियंता विवेक रोकडे यांनी केले.



वृक्षाच्या मनगटावर बांधलेली राखी ही केवळ राखी नसून, मानव आणि निसर्ग यांच्यातील अतूट व जिव्हाळ्याच्या नात्याचे प्रतीक आहे. या पवित्र बंधनाच्या साक्षीने निसर्गाचे संरक्षण, वृक्षांचे संवर्धन आणि भावी पिढ्यांसाठी हरित व शाश्वत भविष्य घडविण्याचा संकल्प आपण करीत आहोत, असा संदेश त्यांनी दिला.

खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात हा पर्यावरणपूरक उपक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना मुख्य अभियंता रोकडे म्हणाले, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केवळ झाडे लावणे पुरेसे नसून त्यांचे जतन करणे तितकेच गरजेचे आहे. हा उपक्रम केवळ कागदावर किंवा कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता, प्रत्यक्षात निसर्ग रक्षणासाठी प्रत्येकाने एक पाऊल पुढे टाकावे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी निसर्गाशी नाते अधिक घट्ट करण्याचा व परिसर हरित ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. मुख्य अभियंता विवेक रोकडे यांनी उपस्थितांना वृक्षरोपण व वृक्षसंगोपनाची शपथ दिली.

हा उपक्रम मुख्य अभियंता विवेक रोकडे यांच्या शुभहस्ते पार पडला. कार्यक्रमाला उपमुख्य अभियंता सचिन डेगवेकर, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, अधीक्षक अभियंता मुनेश्वर, संदीप देवगडे, अजय पुंड, आखरे, सखालकार, तसेच संगेवार यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'अनोखा बाजार' ३० ऑगस्ट रोजी खामल्यात

## 'सोबत' पालकत्व प्रकल्पाचा समाजोपयोगी उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

घरात वर्षानुवर्षे वापराविना पडून असलेल्या वस्तूंना नवे आयुष्य देत त्या गरजूंच्या उपयोगी आणण्याच्या उद्देशाने 'सोबत' पालकत्व प्रकल्पाच्या वतीने रविवार, ३० ऑगस्ट रोजी 'अनोखा बाजार' भरविण्यात येणार आहे. गुलमोहर सभागृह, खामला येथे सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत हा उपक्रम होईल.

श्री सिद्धिविनायक सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष, माजी आमदार तथा माजी महापौर संदीप जोशी यांच्या प्रेरणेतून तात्या टोपेनगर येथील तात्या टोपे हॉलमध्ये जुलै महिन्याच्या शेवटच्या रविवारी 'अनोखा बाजार' या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली होती. या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक नागरिकांनी आपल्या गरजेच्या वस्तू येथून नेल्या. आता खामला परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार दुसरा 'अनोखा बाजार' गुलमोहर सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन नरेंद्रजी जोग आणि आशिषजी कलोडे यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संदीप जोशी राहतील.

'अनोखा बाजार'मध्ये दानदात्यांकडून मिळालेल्या घरातील अतिरिक्त तसेच वापरात नसलेल्या, मात्र सुस्थितीत असलेल्या वस्तू ठेवण्यात येणार आहेत. यामध्ये सायकल, अभ्यासाचे टेबल, पुस्तके, संगणक, कपाट, घड्याळ, भांडी, खेळणी, कपडे यांसह दैनंदिन जीवनात उपयोगी ठरणाऱ्या विविध वस्तूंचा समावेश आहे. गरज असलेल्या नागरिकांना नोंदणी करून या वस्तू निःशुल्क आणि सन्मानाने घरी घेऊन जाता येणार आहेत.

वस्तूंचा पुनर्वापर, गरजूंना मदत आणि माणुसकीची भावना वृद्धिंगत करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात येणार आहे. या माणुसकीच्या उत्सवात नागरिकांनी कुटुंबीय, मित्रपरिवार आणि शेजाऱ्यांसह सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक प्रणव घुगरे तसेच सहसंयोजक ज्योत्स्ना कु-हेकर आणि संदीप मानकर यांनी केले आहे.

या उपक्रमाच्या आयोजनासाठी मंजुषा जोशी, आनंद टोळ, प्रकाश रथकंठीवार, प्रणय मोहबंसी, गजानन निशितकर, कौशिक जोशी आणि वंदना शर्मा यांचे सहकार्य लाभत आहे.

# बल्लारपूर पेपर मिलची शासन जमा झालेली १९.४३ हेक्टर जमीन नगर परिषद बल्लारपूरकडे हस्तांतरित करावे!

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

दि.२८ ऑगस्ट, २०२६ रोजी, नगर परिषद अध्यक्षा अलका अनिल वाढई, उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, माजी नगराध्यक्षा छाया मडावी आणि नगरसेवक भास्कर माकोडे यांचा शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी वसुमना पंत यांची भेट घेऊन बल्लारपूर पेपर मिलची शासन जमा झालेली १९.४३ हेक्टर जमीन नगर परिषद बल्लारपूरकडे हस्तांतरित करावे या मांगनीचे निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की,बल्लारपूर शहर हे चंद्रपूर जिल्ह्यातील महत्त्वाचे औद्योगिक व नागरी केंद्र असून शहराची भौगोलिक रचना व उपलब्ध भौगोलिक क्षेत्र विचारात घेता भविष्यातील नागरी विकासासाठी नगर परिषदेसमोर जागेची मोठी मर्यादा निर्माण होत आहे.

बल्लारपूर शहराच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता, शहराच्या एका बाजूस नदीचे क्षेत्र, दुसऱ्या बाजूस वन/जंगल क्षेत्र तसेच काही दिशांना ग्रामपंचायत क्षेत्र असल्यामुळे शहराचा नियोजनबद्ध व आवश्यक त्या प्रमाणात विस्तार करण्यास नैसर्गिक व प्रशासकीय मयार्दा आहेत. परिणामी, वाढती लोकसंख्या, निवासी वसाहती, सार्वजनिक सुविधा, रस्ते, शासकीय/ निमशासकीय कार्यालये, क्रीडा व सांस्कृतिक सुविधा, उद्याने, सामाजिक उपयोगाच्या जागा तसेच भविष्यातील विविध नागरी पायाभूत सुविधा यांचे नियोजन करताना नगर परिषदेस उपलब्ध असलेली जमीन अपुरी पडण्याची शक्यता आहे.



बल्लारपूर पेपर मिलची १९.४३ हेक्टर जमीन शासन जमा झालेली असून सदर जमीन नगर परिषद बल्लारपूरच्या हद्दीत/शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी उपलब्ध होऊ शकते. सदर जमीन नगर परिषदेकडे हस्तांतरित झाल्यास तिचा वापर केवळ नगर विकासाच्या व्यापक व सार्वजनिक हिताच्या उद्देशाने करता येणे शक्य होईल.

सदर जमिनीचा उपयोग प्रधानमंत्री आवास योजना, श्रम साफल्य योजना, वाहनतळ, बाजार (मार्केट) / करीता तसेच भविष्यातील नियोजनबद्ध नागरी विस्तार, सार्वजनिक उपयोगाच्या सुविधा, रस्ते व वाहतूक व्यवस्था, उद्याने व खुल्या जागा, सामाजिक व सांस्कृतिक सुविधा, प्रशासकीय इमारती तसेच शहराच्या - दीर्घकालीन विकास आराखड्यानुसार आवश्यक असलेल्या इतर सार्वजनिक प्रयोजनांसाठी करता येईल.

त्यामुळे बल्लारपूर शहराच्या सद्यस्थितीचा तसेच आगामी काळातील वाढती लोकसंख्या व नागरी गरजा यांचा सर्वंकष विचार करता, शासन जमा झालेली १९.४३ हेक्टर जमीन नगर परिषद बल्लारपूरकडे हस्तांतरित करणे हे शहराच्या नियोजनबद्ध व शाश्वत विकासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक व सार्वजनिक हिताचे आहे.

तरी, सदर १९.४३ हेक्टर शासन जमा जमीन नगर परिषद बल्लारपूरकडे हस्तांतरित करण्याबाबत आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करून शासन स्तरावर प्रस्ताव सादर करण्यास/मंजुरी मिळविण्यास मान्यता व मार्गदर्शन प्रदान करण्यात यावे, अशी मागनी जिल्हाधिकारी यांना करण्यात आली.

**थोडक्यात**

## विद्युत तारेला स्पर्श, बैलाचा मृत्यू

### शेतकरी आर्थिक अडचणीत, नुकसानभरपाईची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

तालुक्यातील वासी येथे महावितरणची विद्युत तार तुटून त्याच्या संपर्कात आल्याने बैलाचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (ता. २८) सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली. या घटनेत शेतकरी डोमाजी इंगळे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. इंगळे यांचा बैल विद्युत प्रवाहाच्या संपर्कात येताच त्याला जोरदार विजेचा धक्का बसला. यात बैलाचा जागीच मृत्यू झाला. विद्युत पुरवठा करणारी सर्व्हिस वायर तुटलेली होती. मात्र, त्याबाबतची माहिती कोणालाही नव्हती, अशी माहिती महावितरणचे कनिष्ठ अभियंता राऊत यांनी दिली.

घटनेची माहिती मिळताच महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. नियमानुसार शेतकऱ्याला नुकसानभरपाई मिळणार असल्याचे राऊत यांनी सांगितले. दरम्यान, विद्युत तारांची योग्य देखभाल न केल्यामुळे ही घटना घडल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, इंगळे यांना तातडीने योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांना कायदेविषयक हक्कांची माहिती



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त तालुका विधी सेवा समितीच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांसाठी जवराबोडी (नवीन) आणि तास येथील आदिवासी आश्रमशाळांमध्ये जनजागृती शिबिर घेण्यात आले. पीएलव्ही नरहरी पेंदाम यांनी विद्यार्थ्यांना विविध कायदे व त्यांच्या हक्कांबाबत मार्गदर्शन केले. जवराबोडी येथील शिबिरात ६० हून अधिक, तर तास येथील शिबिरात ५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. यावेळी बाल हक्क, पोक्सो कायदा, वन हक्क कायदा २००६, पेसा कायदा १९९६ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याबाबत माहिती देण्यात आली. तसेच आदिवासींचे हक्क, शिक्षणाचा अधिकार आणि कायदेशीर मदतीसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

यावेळी आश्रम शाळेचे मुख्याध्यापक विजय देवतळे, शिक्षक हटवार व विद्यार्थी उपस्थित होते. कायदेविषयक मदतीसाठी टोल फ्री क्रमांक १५१०० आणि बाल मदतीसाठी १०९८ या क्रमांकांची माहितीही देण्यात आली. दोन्ही शिबिरांत मिळून ११० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भावना खरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याला उपस्थिती



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या चुलत भगिनी भावना खरे यांच्या एकसष्ठी निमित्ताने आयोजित कौटूंबिक समारंभात सहभागी होऊन त्यांचे अभिष्टचिंतन केले. प्रतापनगरातील नक्षत्र सेलिब्रेशन येथे या कौटुंबिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी वैदिक मंत्रोच्चारात भावना खरे यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी त्यांच्या मातोश्री शोभाताई फडणवीस यांच्यासह कुटुंबातील सदस्य, नातेवाईक आणि मित्रमंडळी यांची उपस्थिती होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कौटुंबिक सोहळ्यात सहभागी होऊन भावना खरे यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नरेंद्र नगरातील जन्माष्टमी मित्रपरिवार दहीहंडी कार्यक्रमाला भेट दिली.

## खिडकीत ठेवलेली घराची चावी चोरट्यांच्या पथ्यावर, ३० ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

घराला कुलूप लावून चावी खिडकीजवळ ठेवण्याची बाब चोरट्यांच्या पथ्यावर पडली. घरातील मंडळी शेतमजुरी व म्हशी चारण्यासाठी बाहेर गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. कपाटातील सुमारे ३० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ३ हजार ५०० रुपये रोख असा ऐवज लंपास केला. ही घटना सालेशहरी (पुनर्वसन) येथे २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० ते दुपारी २.३० वाजताच्या दरम्यान घडली.

उत्तम सालोरकर यांच्या घरातील सदस्य कामानिमित्त बाहेर गेले होते. घराला कुलूप लावून त्याची चावी नेहमीप्रमाणे खिडकीजवळ ठेवण्यात आली होती. याचाच फायदा घेत चोरट्याने चावी मिळवून घरात प्रवेश केला. २८ ऑगस्ट रोजी सकाळी कपाट उघडले असता दागिने ठेवलेली पर्स गायब असल्याचे आढळून आले. कपाटाचा लॉकरही उघडा होता. चोरट्याने १० ग्रॅम सोन्याचा गोफ, ५ ग्रॅमची अंगठी, दोन नथ, दोन जोड कानातले व मंगळसूत्र असा अंदाजे साडेचार लाख रुपये किमतीचा ऐवज आणि रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी उत्तम सालोरकर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

# मनपाच्या स्वच्छता दूतांना राखी बांधत शिवानी दाणी यांनी दिल्या शुभेच्छा

### 'आरोग्यरक्षक भाऊ' यांना लिहिले पत्र

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर शहराची स्वच्छता आणि नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी वखरे यांनी यावर्षीचा रक्षाबंधन अतिशय आगळ्यावेगळ्या आणि संवेदनशील पद्धतीने साजरा केला.त्यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांना राखी बांधून आणि शुभेच्छापत्र देऊन त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त करण्यात आला.

नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी-वखरे यांच्या विशेष पुढाकाराने या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. नागपूरला स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यात मोलाचा वाटा असणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या कार्याला सलाम करण्यासाठी हा दिवस अत्यंत भावनिक ठरला.

**कर्तव्याशी तडजोड न करणाऱ्या योद्ध्यांचा सन्मान**

नागपूरची रोगराईपासून रक्षा करणारे हे स्वच्छता कर्मचारी शहराच्या आरोग्यव्यवस्थेतील



अत्यंत महत्त्वाचा कणा आहेत. उन्हाळा असो, मुसळधार पाऊस असो किंवा कोणताही मोठा सण-उत्सव असो, नागरिकांच्या सुविधांसाठी आणि शहर स्वच्छ ठेवण्यासाठी हे कर्मचारी सातत्याने आपले कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या याच अतुलनीय योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा एक अत्यंत अर्थपूर्ण प्रयत्न असल्याचे स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी यावेळी सांगितले.

**"सुरक्षेची आणि संरक्षणाची भावना जपणारा सण"**

या उपक्रमाबाबत बोलताना श्रीमती. शिवानी दाणी-वखरे म्हणाल्या, आपल्या शहराची रक्षा करणाऱ्या प्रत्येक स्वच्छता कर्मचाऱ्याच्या हाताला सन्मान मिळणे ही आपली जबाबदारी आहे. रक्षाबंधन म्हणजे केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून, एकमेकांच्या सुरक्षिततेची आणि संरक्षणाची भावना जपणारा दिवस आहे. नागपूरला स्वच्छ आणि निरोगी ठेवणाऱ्या आपल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आज त्यांना राखी बांधून मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र योगदान देणाऱ्या प्रत्येक स्वच्छता कर्मचाऱ्याला यावेळी उपस्थितांतर्फे मानाचा मुजरा करण्यात आला.

---

थोडक्यात

## पोरवाल महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**
सेठ केसरिमल पोरवाल महाविद्यालय, कामठी येथे २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना क्रीडा, शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, संघभावना आणि नियमित व्यायामाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा व शारीरिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रगती करून महाविद्यालयाचे तसेच देशाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.
कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ स्वप्नील दहात उपप्राचार्य श्री विश्वनाथ वंजारी पर्यवेक्षक श्री मेंढे सर, क्रीडा शिक्षिका डॉ मल्लिका नागपूरे स योजक,श्री मासुरकर सर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा विभाग व सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले. खेळा, तंदुरुस्त राहा आणि निरोगी जीवनाचा स्वीकार करा, हा संदेश देत कार्यक्रमाची सांगता झाली.

## खापरखेडा पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाशी कार्यकारी संचालक विवेक रोकडे यांची संवाद बैठक




**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता तथा नवनियुक्त कार्यकारी संचालक विवेक रोकडे यांनी नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघ संलग्न खापरखेडा पत्रकार संघाच्या विशेष बैठकीचे आयोजन वीज केंद्राच्या सौदामिनी कार्यालयाच्या सभागृहात केले होते. यावेळी खापरखेडा परिसरातील ज्वलंत प्रश्न व वीज केंद्र परिसरातील समस्यांबाबत खेळीमेळीच्या वातावरणात सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रश्नांचे लवकरात लवकर निराकरण करण्याचे आश्वासन मुख्य अभियंता तथा नवनियुक्त कार्यकारी संचालक विवेक रोकडे यांनी खापरखेडा पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाला दिले. मुख्य अभियंता विवेक रोकडे यांची कार्यकारी संचालक पदावर नियुक्ती झाल्याबद्दल खापरखेडा पत्रकार संघातर्फे शाल, श्रीफळ व गुलाबाचे रोपटे देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.
याप्रसंगी उपमुख्य अभियंता नितीन रोकडे, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, खापरखेडा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील जालंदर, सचिव अभय मिश्रा, सहसचिव मयूर तिरपुडे,उपाध्यक्ष कपिल वानखेडे, राजेश खंडारे, वरिष्ठ मार्गदर्शक केशव पानतावणे, मनोज डेव्हिड, सुरेश वानखेडे, श्रीकांत जालंदर, विक्की थापा यांच्यासह खापरखेडा पत्रकार संघाचे पदाधिकारी व वीज केंद्राच्या सुरक्षा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी साकारली प्लास्टिक बॉटलपासून भव्य राखी



### 'बेस्ट फ्रॉम वेस्ट' पासून जम्बो राखी

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**
शाळेतील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन प्लास्टिकच्या टाकाऊ बाटल्यांपासून एक भव्य आणि आकर्षक राखी तयार केली आहे. रक्षाबंधनाचे औचित्य साधून बनवलेली ही राखी सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मौदा येथील कलाशिक्षक सचिन कन्नाके यांच्या मार्गदर्शनात इयत्ता सहावी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांनी टाकाऊ प्लास्टिक बॉटल पासून तीन वेगवेगळ्या भव्य राख्या तयार केल्या प्लास्टिक प्रदूषणाबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे २०० पेक्षा जास्त रिकाम्या प्लास्टिक बॉटल्स आणि कागदाचा वापर करून अवाढव्य तीन राखी साकारण्यात आली आहे. प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर कसा करता येऊ शकतो, हे या माध्यमातून दाखवून देण्यात आले.
पूर्णपणे कचऱ्यात जाणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या स्वच्छ करून ही राखी बनवली. "निसर्गाचे रक्षण करणे हीच खरी सुरक्षा आहे," असा संदेश या राखीच्या माध्यमातून देण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक अनिल मेश्राम, उपमुख्याध्यापक नामदेव तांबडे, पर्यवेक्षक यशवंत मस्के व गजेंद्र नासरे तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या या कल्पकतेचे भरभरून कौतुक केले आहे.

---

## सर्व शाखीय कुणबी-ओबीसी कृती समितीचा ओबीसी जातीनिहाय जनगणनेसाठी केंद्र सरकारला आंदोलनाचा इशारा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
ओबीसी प्रवर्गाची जातीनिहाय जनगणना करण्यात यावी तसेच ओबीसी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्या तातडीने पूर्ण करण्यात याव्यात, या मागणीसाठी सर्व शाखीय कुणबी ओबीसी कृती समिती संघटनेच्या माध्यमातून नागपुरात सभा घेण्यात आली. यावेळी संयोजक राजेश काकडे, अखिल कुणबी समाजाचे माजी अध्यक्ष व माजी जिल्हा परिषद सभापती




पुरुषोत्तम शहाणे, ज्येष्ठ समाजसेवक नरेश बरडे, तिरळे कुणबी सेवा मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग वाकडे, सुरेश कोंगे, सुरेश जिचकार, एकनाथ काळमेघ, महादेव बोराटे उपस्थित होते.
सभेचे संयोजक राजेश काकडे यांनी ओबीसी समाजाच्या विविध मागण्या मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे सांगितले. केंद्र सरकारने ओबीसी समाजाच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहावे, यासाठी आंदोलनाचा आराखडा लवकरच पत्रकारांसमोर मांडण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाची प्रस्तावना ॲड. अंजली साळवे यांनी केली तर सूत्रसंचालन उपसरपंच सोपान वानखेडे यांनी केले.

---

## ६% मते बाद, पण लोकशाहीचा धडा शंभर टक्के पक्का!

### थुगाव निपाणी येथील पहिलीपासूनच्या विद्यार्थ्यांनी साजरा केला लोकशाहीचा उत्सव




**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा थुगाव निपाणी येथे शालेय विद्यार्थी मंत्रिमंडळ व 'उन्नती विद्यार्थी बचत बँक' संचालक मंडळ निवडणूक २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. दिनांक २२ ऑगस्ट २०२६ रोजी मतदान प्रक्रिया घेण्यात आली, तर २४ ऑगस्ट २०२६ रोजी निकाल जाहीर करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये, मतदानाचे महत्त्व, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने निवडणूक प्रक्रिया प्रत्यक्ष लोकशाही पद्धतीने राबविण्यात आली. विशेष म्हणजे इयत्ता पहिलीपासूनच्या विद्यार्थ्यांना मतदार म्हणून सहभागी करून घेण्यात आले.
निवडणुकीचे सर्वाधिक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे मतपत्रिकेवर झालेल्या मतदानापैकी केवळ ६ टक्के मते बाद झाली. लहान वयातील विद्यार्थ्यांनीही मतदान प्रक्रिया समजून घेत उत्स्फूर्तपणे मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव देणारा हा उपक्रम ठरला. सदर निवडणुकीत ज्ञानक्रांती विद्यार्थी पक्षाकडून भावेश चौधरी, हिमांशू चौधरी, पार्थ चौधरी, विपुल बडोदेकर, वंश उईके, ज्ञानदा गुंड आणि चैताली चौधरी हे विजयी झाले. नवयुवक विद्यार्थी पक्षाकडून सारंग देशमुख, अंशू ढोले, हर्ष ढोले आणि वैभवी वैष्णव यांनी विजय मिळविला. तसेच विद्यार्थी राष्ट्रनिर्माण पक्षाकडून उमंग आखरे आणि गौरी लष्करे हे विजयी झाले. उमेदवारी अर्ज भरणे, प्रचार, मतदान, मतमोजणी आणि निकाल जाहीर करणे या संपूर्ण प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना लोकशाही, नेतृत्व, संघभावना, निर्णयक्षमता आणि जबाबदारी यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.
उन्नती विद्यार्थी बचत बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीमुळे विद्यार्थ्यांना बचत, आर्थिक शिस्त आणि बँकिंग व्यवहारांची प्राथमिक ओळख करून देण्याचा अभिनव प्रयत्नही करण्यात आला. निवडणूक यशस्वीपणे पार पडल्याबद्दल नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शाळा व्यवस्थापनाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

---

## लोकसहभागातून थूगाव निपाणीच्या ४९ विद्यार्थ्यांना आकाशाची भरारी!

### १ लाख १४ हजारांच्या लोकसहभागासह पालकांच्या मदतीने साकारतेय विद्यार्थ्यांची विमानवारी, इस्रोसह बंगळुरूमधील नामांकित संस्थांना भेट

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकाशाची उंची देत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, थूगाव निपाणी येथील ४९ विद्यार्थी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाच्या संध्येला नागपूर ते बंगळुरू असा विमानप्रवास करणार आहेत. विशेष म्हणजे पालक, माजी विद्यार्थी, अधिकारी आणि विविध क्षेत्रातील दातृत्वशील व्यक्तींच्या उत्स्फूर्त लोकसहभागातून या शैक्षणिक सहलीसाठी तब्बल १ लाख १४हजारांची मदत उपलब्ध झाली आहे. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण न देता प्रत्यक्ष अनुभवातून विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण, इतिहास आणि संस्कृतीची ओळख व्हावी, या उद्देशाने या विशेष शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले आहे.
या उपक्रमासाठी माजी



गटविकास अधिकारी डॉ. निलेश वानखडे यांनी २५ हजार, अमित चौधरी यांनी २५ हजार, माजी विद्यार्थी यादवराव चौधरी यांनी १५ हजार अशी मदत केली आहे. यांच्यासह विद्यमान गटविकास अधिकारी अक्षय भगत, मान. शारदाबाई देशमुख, आरोग्य केंद्र, भिष्णूर येथील कर्मचारी वर्ग विक्रीकर सहायक आयुक्त हिमांशू रेवतकर, मेजर सतीश घागरे, विनोदराव चौधरी यांच्यासह अनेक दातृत्वशील व्यक्तींनी या उपक्रमाला आर्थिक हातभार लावला आहे.
लोकसहभागातून उभ्या राहिलेल्या या मदतीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या शैक्षणिक संस्थांना प्रत्यक्ष भेट देण्याची आणि विमानप्रवासाचा अनुभव घेण्याची अनोखी संधी उपलब्ध झाली आहे. एक विद्यार्थी-एक स्वप्न-एक संधी या भावनेतून समाजाने दिलेला हा हातभार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याला नवी दिशा देणारा ठरत आहे.

**इस्त्रोपासून बंगलोर पॅलेसपर्यंत शैक्षणिक सफर**

५ सप्टेंबर रोजी विद्यार्थी नागपूरहून विमानाने बंगळुरूकडे प्रयाण करतील. ६ व ७ सप्टेंबर रोजी विद्यार्थी, हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (एच.ए.एल.), नेहरू प्लॅनेटोरियम, बंगळुरू पॅलेस, बोटॅनिकल गार्डन, इस्कॉन टेम्पल आणि पॅराडाइज ॲक्वेरियम आदी ठिकाणांना भेट देतील. इस्त्रो व एच.ए.एल.च्या भेटीत विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधन, उपग्रह व विमान तंत्रज्ञानाची माहिती मिळणार आहे. नेहरू प्लॅनेटोरियममधून खगोल शास्त्राची ओळख होणार असून, बोटॅनिकल गार्डन व ॲक्वेरियममधून पर्यावरण आणि जैवविविधतेचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. बंगळुरू पॅलेस व इस्कॉन मंदिराच्या भेटीत इतिहास, कला व संस्कृतीची अनुभूती विद्यार्थ्यांना घेता येणार आहे. ८ सप्टेंबर रोजी सकाळी रेल्वेने परतीचा प्रवास करून विद्यार्थी थूगाव निपाणी येथे परतणार आहेत.
ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी समाजातील विविध स्तरांतून मिळालेला हा प्रतिसाद कौतुकास्पद असून, 'लोकसहभागातून शिक्षणाला मिळालेली ही भरारी' थूगाव निपाणीच्या शैक्षणिक वाटचालीतील एक अविस्मरणीय अध्याय ठरणार आहे.

---

## अशोक रामटेककर यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर** : एलआयसीचे सेवानिवृत्त कर्मचारी अशोक रामटेककर (वय ६१,रा.महाल) यांचे आज शनिवारी दुपारी दीर्घ आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्तपरिवार आहे.

---

## 'स्वरयात्रे'च्या सुरांनी नूतनीकृत सोमलवार सभागृहाचा शुभारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या अजरामर गीतांनी सजलेल्या स्वरयात्रेच्या सुरेल मैफलीने सोमलवार शिक्षण संस्थेच्या नूतनीकृत अण्णासाहेब सोमलवार सभागृहाचा शुभारंभ झाला.
'ज्ञानादेव तु कैवल्यम्' हे ब्रीदवाक्य घेऊन गेल्या ११५ वर्षांपासून नागपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या सोमलवार शिक्षण संस्थेच्या खामला परिसरातील अण्णासाहेब सोमलवार सभागृहाचे नूतनीकरण करण्यात आले आहे.



आधुनिक सुविधांनी सुसज्ज करण्यात आलेल्या या सभागृहाचे उद्घाटन प्रसंगी शनिवारी प्रमुख अतिथी म्हणून ॲड. आनंद परचुरे उपस्थित होते. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सभागृहाचे उद्घाटन करण्यात आले.
यावेळी सोमलवार शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रामदास सोमलवार यांनी इंटर-स्कूल स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने सभागृहाची उभारणी करण्यात आली असल्याचे सांगितले. शाळेचे कार्यक्रम नसताना सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठीही हे सभागृह उपलब्ध करून दिले जाणार असल्याचे ते म्हणाले.
उद्घाटनानिमित्त आयोजित स्वरयात्रा या विशेष सांगीतिक कार्यक्रमातून आशा भोसले यांच्या गाजलेल्या गीतांना नव्या स्वरांतून उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात 'जय शारदे वागेश्वरी' या शारदा देवीच्या स्तवनाने झाली.
निकेता जोशी यांनी ऋतू हिरवा, चांदणे शिंपीत जाशी, छोटी सी कहानी से, रुपेरी वाळूत, शारद सुंदर आदी गीते सादर केली. अनुजा मेंघाल-सावजी यांनी नभ उतरू आलं आणि मलमली तारुण्य माझे या गीतांनी रसिकांची दाद मिळविली.
धुंदी कळ्यांना, चुरा लिया है तुमने, अभी ना जाओ छोड़कर, गोमू संगतीनं, जांभूळ, रात के हमसफर, आइये मेहरबान, इशारो इशारो, दीवाना हुआ बादल, होले होले साजना, चंद्र आहे साक्षीला, जीवन के हर मोड़, तू तू है वही, निगाहे मिलाने को आणि उषःकाल होता यांसारख्या लोकप्रिय द्वंद्वगीतांनी कार्यक्रमात रंग भरला.
योगेंद्र रानडे आणि सारंग जोशी यांनी सुरेल साथ दिली. वाद्यवृंदावर परिमल जोशी, अमर शेंडे, ऋग्वेद पांडे, चाहूल नागपुरे, प्रशांत नागमोते, महेंद्र वाटुलकर आणि पंकज यादव यांनी उत्कृष्ट साथसंगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली देशपांडे यांनी केले. या कार्यक्रमाची संकल्पना समीर पंडित यांची होती. यावेळी सोमलवार शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद आणि मान्यवर उपस्थित होते.

